**दिनांक ०३.१२.२०२५ रोजी मिशन कार्यालय, अमरावती येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंब व इतर शेतकरी यांना कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांचा लाभ देण्याबाबत तसेच अमरावती विभागात चारा लागवड करण्याबाबत विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती व अधिक्षक कृषी अधिकारी (रोहयो), गटचिकास अधिकारी अमरावती यांचे समवेत बैठक व चर्चा**





**दिनांक ०४.१२.२०२५ रोजी खंडाळा, ता. नरखेड, जि. नागपूर येथे प्रधानामंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योग योजना संबंधी कृषी विभाग, नागपूर द्वारा आयोजीत प्रशिक्षण व मार्गदर्शन सोहळा कार्यक्रमास उपस्थित**







ग्रामविकास व पंचायतराज विभाग
(बु.)
ॲनीमिया मुक्त गाव
उद्योगाकरिता रू.१ लाख ते 3 कोटी
अन्न प्रक्रिया उद्योगाकरिता प्रकल्प किंमतीच्या ३५ टक्के अनुदान
योजनेची वैशिष्ट्ये
आवश्यक कागदपत्रे
अधिक माहीती व मोफत
रवि सलामे सर - 88305
925472
(PMFME जिल्हा संसाधन व्यक्ती, नागपुर)
@gmail.com



दिनांक ०५.१२.२०२५ रोजी सोनगांव, ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती येथे श्री. सुभाष लुटे यांचे शेतामध्ये मृद दिनानिमित्त्य कृषी विभाग, अमरावती द्वारा आयोजीत चर्चासत्र कार्यक्रमास उपस्थित










# सोनेगाव खर्डा येथे जागतिक मृदा आरोग्यदिन

## कृषी विज्ञान केंद्र, घातखेड यांचे आयोजन



**नमस्कार अमरावती**

**चांदूररेल्वे (ता.प्र.) दि. ७ :** भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था,नागपूर यांच्या मार्फत कापसाच्या उत्पादन क्षमतेमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने विशेष कापूस प्रकल्प अमरावती जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत कृषि विज्ञान केंद्र, घातखेड यांच्या वतीने धामणगाव तालुक्यातील सोनेगाव खर्डा येथील शेतकरी सुभाष लुटे यांच्या शेतावर सघन लागवड पद्धत कापूस लागवड तंत्रज्ञान प्रात्यक्षिकाचा शेतीदिन व जागतिक मृदा आरोग्यदिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष कृषि विज्ञान केंद्र, घातखेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. अतुल कळसकर हे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन कै वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन,महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष ॲड.निलेश हेलोंडे पाटील यांचे हस्ते संपन्न झाले. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अमरावती राहुल सातपुते, प्रकल्प संचालक आत्मा अमरावती अर्चना निस्ताने यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी अमरावती संजय वानखडे, तालुका कृषी अधिकारी धामणगाव रेल्वे गजानन राऊत, सोनेगाव सरपंच माधुरी पंचबुद्धे, ग्रा.पं. सदस्य प्रवीण खैरकर, विषय विशेषज्ञ कृषीविद्या प्रमोद मेंढे, कृषि अभियांत्रिकीचे राजेश राठोड, विषय विशेषज्ञ कृषी विस्तार अमर तायडे, प्रगतशील शेतकरी सुभाष लुटे, पुरस्कार प्राप्त नामदेव वैद्य प्रामुख्याने उपस्थित होते. उद्घाटनपर भाषणामध्ये ॲड. निलेश हेलोंडे यांनी मातीचे महत्व व नैसर्गिक शेतीचे महत्व अधोरेखित करताना बायोचारच्या निर्मिती तसेच वापरा-वर भर देऊन सहकारातून समृद्धी शक्य असल्याचे मत केले. प्रमुख मार्गदर्शक राहुल सातपुते यांनी कृषी विस्तार ॲप बद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीमध्ये समृद्धता येऊ शकते असे मत व्यक्त केले. अर्चना निस्ताने यांनी आधुनिक परंतु शाश्वत शेती बद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ.अतुल कळसकर यांनी नैसर्गिक संसाधनांच्या सुयोग्य वापरासाठी नैसर्गिक शेतीची कास धरावी असे आवाहन केले. प्रमोद मेंढे यांनी कापूस झाडांची संख्या वाढ करून उत्पादकतेत वाढ करता येणे शक्य असल्याचे सांगीतले. शेतकरी सुभाष लुटे यांनी सघन लागवडीचे अनुभव सांगताना उत्पादन वाढल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन विषय विशेषज्ञ कृषी विस्तार अमर तायडे तर आभार कृषि अभियांत्रिकी तज्ज्ञ राजेश राठोड यांनी मानले. कार्यक्रमासाठी सोनेगाव खर्डा, निंभोरा बोडखा,कासारखेड, जळका पटाचे, विरुळ रोंगे येथील पुरुष व महिला शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रणिता भोंगे, दिगंबर सातंगे, शुभम लहाने, पवन पोकळे, विजय शिरस्कर, सुनील घुबडे, अंकुश सपाटे, ऋतिक काकडे यांनी परिश्रम घेतले.

दिनांक ०८.१२०२५ रोजी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनादरम्यान मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे यांचे समवेत मिशनचे कामकाजासंबंधी चर्चा व अहवाल सादर करताना मा. अध्यक्ष महोदय



दिनांक ०९.१२.२०२५ रोजी मा. ना. श्री. माणिकराव कोकाटे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री याचेसमवेत जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील मैदाने रोजगार हमी योजना अंतर्गत विकसीत करण्यासंबंधी बैठक व चर्चा



दिनांक ०९.१२.२०२५ रोजी नागपूर मा. ना. श्री. मकरंदजी पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री यांना मिशनचे कामकाजसंबंधी माहीतीपुस्तीका देताना व चर्चा करतांना मा. अध्यक्ष महोदय





दिनांक १०.१२.२०२५ रोजी नागपूर येथे मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे, कृषीमंत्री यांना मिशनचे कामकाजासंबंधी माहीतीपुस्तीका देताना मा. अध्यक्ष महोदय



**दिनांक १०.१२.२०२५ रोजी नागपूर येथे मा. ना. श्रीमती आदिती तटकरे, महिला व बालविकास मंत्री यांना आत्म्हत्याग्रसत शेतक-यांचे कुटूंबातील महिलांना महिला व बालविकास विभागाच्या योजनांचा लाभ देण्यासंबंधी निवेदन व चर्चाकरताना मा. अध्यक्ष महोदय**



दिनांक ११.१२.२०२५ रोजी नागपूर येथे मा. ना. श्री. जयकुमार रावल, पणन मंत्री यांना विदर्भात उत्पादीत होणा-या फळपिकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासंबंधी निवेदन देताना मा. अध्यक्ष महोदय



दिनांक १३.१२.२०२५ रोजी प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल येथे मा. ना. श्री. भरतसेठ गोगावले, रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास विभाग यांचे समवेत नागपूर विभागातील संत्रा उत्पादक शेतक-यांच्या समस्यांबाबत चर्चा व संत्रा उत्पादक शेतक-यांच्या शेतास भेट देताना मा. अध्यक्ष महोदय






**दिनांक १३.१२.२०२५ रोजी नागपूर येथे मा. ना. नितीनजी गडकरी साहेब, केंद्रीयमंत्री यांनी चारा लागवड व मिशनचा अहवाल सादर करताना मा. अध्यक्ष महोदय**



दिनांक १३.१२.२०२५ रोजी The Institution of Engineers (India), अमरावती येथे अमरावती जिल्हा बॉडी बिल्डर्स असोसिएशनच्या वतीने लोकनेते स्व.संजयभाऊ बंड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित जिल्हास्तरीय भव्य शरीरसौष्ठव स्पर्धा "युवासेनाश्री एकनाथ चषक २०२५" या कार्यक्रमास उपस्थित






**दिनांक २३.१२.२०२५ रोजी वर्धा येथील महात्मा गांधी ग्रामीण औद्योगिकरण संस्थान (MGIRI) येथे भेट तसेच संत्रा प्रक्रीयाबाबत विभागप्रमुख, शास्त्रज्ञ यांचे समवेत बैठक व चर्चा**






**दिनांक २३.१२.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांचे समवेत चारा लागवडीबाबत बैठक व चर्चा**






दै. तरुण भारत

# शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी समन्वयाने काम करा : ॲड. हेलोंडे

◆ वर्धा, २४ डिसेंबर

जिल्ह्यात विविध कारणांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्याची योग्य अंमलबजावणी करा. शेतकऱ्यांच्या जनावरांना मोफत चारा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी, पशुसंवर्धन, वन व ग्रामविकास विभागाने एकत्रित प्रयत्न करावे, अशा सूचना कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांना मोफत चारा उपलब्ध करून देण्यासाठी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी., निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, उपजिल्हाधिकारी श्रीपती मोरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपायुक्त डॉ. जगदीश बुकतरे आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना शेतीशिवाय आर्थिक उत्पन्नाचे स्रोत नाही. शेतीला जोडधंदा सुरू करण्याकरिता त्यांचे दुग्ध उत्पादन वाढविण्यासाठी मोफत चारा उपलब्ध करून दिल्यास दुग्ध उत्पादन वाढून आर्थिक मदत होईल.

यासाठी कृषी विभागाने गायरान जमिनीवर चारा लागवड करावी. सेलू तालुक्यातील इटकी, महाकाळ, पिंपळखुटा येथे चारा लागवडीकरिता जागा निश्चित करण्यात आली असून तत्काळ कारवाई करण्याच्या सूचनाही यावेळी त्यांनी कृषी व पशुसंवर्धन विभागाला दिल्या.

कारंजा तालुक्यातील काही गावांतील पशुपालक शेतकऱ्यांचे चाऱ्याअभावी चार महिने स्थलांतर होत असतात. यावर उपाय म्हणून पाण्याचे स्रोत असलेल्या तलावाच्या जवळ चारा उत्पादन करावे. सोबतच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील सदस्यांना एमगिरीमार्फत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेले प्रशिक्षण कृषी विभागाच्या वतीने मोफत उपलब्ध करून द्यावे, असेही त्यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)

एमगिरी येथे भेटीदरम्यान संशोधित तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेताना ॲड. नीलेश हेलोंडे पाटील

## एमगिरीला दिली भेट

ॲड. नीलेश हेलोंडे पाटील यांनी एमगिरी येथे भेट देऊन संस्थेच्या विभागामार्फत शेती व अन्य उत्पादनाचे संशोधन करून तंत्रज्ञान विकसित करण्यात येणाऱ्या कामाची तसेच विविध प्रकारचे प्रशिक्षण राबविण्यात येत असलेल्या कामाची माहिती जाणून घेतली. संस्थावर संशोधन करून नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात आलेल्या प्रक्रियेचे शासनाच्या योजनेमार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. तसेच संस्थेमार्फत गायीच्या शेणापासून तयार करण्यात येणाऱ्या कागद, मूर्ती व विविध वस्तूंचे सुद्धा शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. आशुतोष मुरकुटे यांनी संस्थेमार्फत राबविण्यात येणारे संशोधन व प्रशिक्षणाची माहिती दिली. ■

दिनांक २७.१२.२०२५ रोजी आळंदी, ता. खेड, जि. पुणे येथे स्नेहवन सामाजिक उपक्रमास भेट व विद्यार्थ्यांसोबत चर्चा






PERIODIC TABLE




Owen
It's Too Soon

दिनांक २९.१२.२०२५ रोजी डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि. रायगड येथील विद्यापीठ अंतर्गत विविध संशोधन क्षेत्र पाहणी व भेट














दिनांक ३१.१२.२०२५ रोजी संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे कृषी व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांच्यासमवेत बैठक व चर्चा



